
# वार्तापत्र


















## मार्च २०२१

**समर्थन प्रकाशन**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२० ☎०२२-२२००३०६०
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

## समर्थन


संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **डॉ. आशिष भोसले**

संपादन : **मुक्ता भारती**

विश्लेषण
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
सहाय्य
**स्नेहा घरत** -८४८५८९४४६३

प्रसिद्धी
**मनोज सातवी** -९२७३७९६९९९

मांडणी
**प्रतिक्षा कोयंडे**



**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई

सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी



प्रकाशक (पत्रव्यवहार):
१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला,
बॉम्बे हॉस्पिटल जवळ, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग,
मरिन लाईन्स (पू), मुंबई -४०० ०२०
☏०२२-२२००३०६०

Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

**'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर**

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

## समर्थन कशासाठी ?

### मानवी हक्कांसाठी !!

'समर्थन'ची स्थापना ही मुळातच शोषित वंचितांच्या हक्कांची जपणूक करण्यासाठी आणि त्या अनुषंगाने लोकशाही अधिक सकस व बळकट करण्यासाठी झाली आहे. देशातील लोकशाही अधिक वृद्धिंगत व्हावी व लोकशाहीचे फळ देशातील तळागळातील नागरिकांपर्यंत पोहोचावे हा त्यामागचा मुख्य उद्देश राहिला आहे. शासनाने संविधानाची कास सोडता कामा नये, त्याने कल्याणकारी राज्याची भूमिका पार पाडली पाहिजे. यासाठी 'समर्थन' सातत्याने प्रयत्नशील आहे.

लोकांना जबाबदार प्रशासन, लोकनियुक्त लोकसभा, विधानसभा, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि निर्बंधरहित प्रसारमाध्यमे ही आपल्या लोकशाहीचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. या प्रसारमाध्यमांमध्ये आता समाज माध्यमांचीही भर पडली आहे. ही चारही लोकशाहीची अंगे असून, या सर्वांची कामे एकमेकांना पूरक राहिली आहेत. यामध्ये समतोल साधल्याने लोकशाही बळकट होते, परंतु जर या सर्वांमध्ये विसंवाद वा संघर्ष (Conflict) निर्माण झाला तर ती धोक्यात येते. म्हणून लोकशाहीच्या या आधारस्तंभांना कोणतीही शक्ती नियंत्रित करणार नाही; याची काळजी आपण सर्वांनी घेणे गरजेचे आहे. नाहीतर आपल्या सर्वांच्या स्वातंत्र्यावर बंधने यायला वेळ लागणार नाही. अशा अपप्रवृत्ती रोखण्यासाठीच 'समर्थन'चा जन्म झाला आहे.

त्यामुळेच 'समर्थन'च्या कामाचे स्तर हे लोकशाही पूरक राहिले आहेत. त्यामध्ये राज्यस्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे, माहिती अधिकार कायद्याचा जास्तीत जास्त उपयोग करून माहिती मिळवणे, प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे, निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांबाबत विविध स्तरावर चर्चा घडवून आणणे, ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्यामध्ये वाढ करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे, त्याचप्रमाणे राज्याच्या धोरणात्मक निर्णयामध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबित व्हाव्यात, यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा 'समर्थन'चा मुख्य उद्देश राहिला आहे.

आज आपल्या देशात जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्यावर 'समर्थन' सारख्या संस्थेने भाष्य करणे गरजेचे आहे. अमेरिकेतील वॉशिंग्टनमध्ये कार्यरत असणाऱ्या 'फ्रीडम हाऊस'ने प्रकाशित केलेल्या 'ग्लोबल फ्रीडम' या वार्षिक अहवालात सध्याच्या भारतीय स्वातंत्र्याच्या स्तराबाबत मत मांडले आहे. ते मत धोक्याची घंटा वाजविणारे आहे. लोकशाही मूल्यांचा ऱ्हास होत असून, भारतीय संविधानाने भारतीयांना दिलेले हक्क व नागरी स्वातंत्र्य वर्ष २०१४ नंतर गोठविण्यात येत आहेत; असे हा अहवाल सांगतो. या अहवालात स्वातंत्र्याच्या बाबतीत भारताला देण्यात आलेले गुण हे ७१ वरून कमी करून ६७ करण्यात आले आहेत. जगातील २११ देशांमध्ये भारताचा क्रमांक ८८वा आहे. यापूर्वी भारत या यादीत ८३व्या स्थानावर होता. म्हणजे स्वातंत्र्यांच्या बाबतीत भारताची पाच स्थानांनी घसरण झाली आहे. मानवी हक्कांवर काम करणाऱ्या संस्थांवर दबाव वाढत आहे. वेगवेगळ्या विषयांचे जाणकार आणि पत्रकारांना धमकावण्याचे प्रकार वाढले आहेत. झुंडबळी वाढत आहेत, अल्पसंख्यांक व अनुसूचित जाती-जमातींवर होणाऱ्या अत्याचारात मागील काही वर्षात कमालीची वाढ झाली आहे. असेही हा अहवाल सांगतो.

मार्च, २०२० नंतर कोरोनाच्या वैश्विक महामारीच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी (Lock Down) लागू करताना ज्या पद्धतीने स्थलांतरित मजुरांना अनियोजितरित्या आपल्या मूळ गावी परतावे लागले; त्यामुळे कोट्यवधी लोकांचे भारतात हाल झाले. शेकडो किलोमीटर पायी प्रवास करावा लागला. यातून नागरिकांच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली झाली आहे. यावरून सध्या भारतात लोकशाही आणि स्वातंत्र्याची स्थिती किती गंभीर बनली आहे याचा अंदाज येतो. लोकशाहीची ताकद असलेल्या संस्थांना जे अधिकार संविधानाने व कायद्याने दिले आहेत. आज ते अधिकार सत्ताधाऱ्यांकडून गोठवण्याचे प्रयत्न सुरू आहेत वा अधिकाराचा गैरवापर करून ते केले जात आहे. मानवी हक्क व सरकारच्या कामगिरीचे मूल्यांकन (Social Audit) करणाऱ्या गैर शासकीय संस्थांवर दबाव वाढविला जात आहे, असे मत या अहवालात व्यक्त करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचा विचार केला तर राज्यात आज महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आहे. मात्र केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यातील वितुष्टेमुळे अनेक स्तरावर अडचणी येताना दिसत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर 'समर्थन'ने विविध क्षेत्रांचा घेतलेला आढावा या वार्तापत्रात मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये १) राज्य शासनाकडून वर्ष २०२०-२१ मध्ये अर्थसंकल्पाच्या तुलनेत प्रत्यक्षात उपलब्ध झालेला निधी, राज्याच्या महसूलात झालेली घट तसेच केंद्र शासनाकडून वस्तू व सेवा कराचा (GST)

अपुरा परतावा, २) पालघर जिल्ह्यातील रोजगारासाठी स्थलांतर करणारे मजूर, त्यांच्या प्रश्नांबाबत 'समर्थन' व 'श्रमजीवी संघटने'ने केलेले सर्वेक्षण, ३) रोजगार हमी योजनेवर काम करूनही मजुरांची २-२ महिन्याची मजुरी प्रलंबित असणे. त्यामुळे कोरोना काळात गरीब आदिवासी मजुरांवर आलेली उपासमारीची वेळ, ४) कोरोना काळात राज्यातील विशेषत: प्रगत जिल्ह्यात वाढलेले अर्भक मृत्यूचे प्रमाण तसेच ५) दिल्ली शहरात, वर्ष २०१२ मध्ये निर्भया प्रकरण घडल्यानंतर अशा प्रकारचे गुन्हे पुन्हा घडू नयेत म्हणून राज्यांना त्यावर उपाययोजना करण्यासाठी निर्भया निधी देऊ केला परंतु महाराष्ट्रात तो निधी अखर्चित राहणे. या विषयावर सदर वार्तापत्रात आढावा घेतला आहे. जेणे करून, वर्तमानपत्र, दृक-श्राव्य माध्यम व समाज माध्यम यांच्या समोर मानवी हक्कांचे प्रश्न नेता येतील. 'समर्थन' हाताळत असलेल्या सामाजिक विषयांना दाद मिळण्यासाठी जनमत तयार व्हावे हा या मागचा मुख्य उद्देश आहे. 'समर्थन' प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात असे बातमीपत्रक प्रसिद्ध करणार आहे. नुकत्याच झालेल्या 'महिला दिना'चे औचित्य साधून सदर वार्तापत्र आपल्या भेटीला आणत आहोत. आपल्या सर्वांच्या शुभेच्छा या वार्तापत्रासाठी आवश्यक आहेत.

सदर वार्तापत्रातील माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू. प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे. 'समर्थन' प्रकाशित करीत असलेल्या माहितीबाबत अधिक जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी 'समर्थन' स्वीकारीत आहे. धन्यवाद!

**संपर्क व प्रतिक्रिया**: - ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

# कोरोना महामारीचा फटका, राज्य शासनाच्या महसूलात मोठी घट

## २९ हजार २९० कोटी रुपये जीएसटीची भरपाई केंद्र शासनाकडून थकीत

## राज्याचे आर्थिक नियोजन गडगडले

राज्य शासनाने २०२०-२१ मध्ये रु. ३ लाख ४७ हजार ४५६ कोटींचा महसूल जमा करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यापैकी केवळ रु. १ लाख ८८ हजार ५४२ कोटी (५४.२६%) जानेवारी, २०२१ मध्ये जमा झाली आहे. म्हणजे आजही ठेवलेल्या उद्दिष्टापैकी रु. १ लाख ५८ हजार ९१४ कोटींचा महसूल (४५.७४%) जमा होणे बाकी आहे. यावरून राज्याच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते.

राज्य शासनाच्या वित्त विभागाच्या महाकोष वाहिनीवरील अर्थसंकल्प व्यवस्थापन व सनियंत्रण प्रणाली (BEAM) यावरून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार राज्य शासनाने दि. १ एप्रिल, २०२० ते २८ फेब्रुवारी, २०२१ या ११ महिन्याच्या कालावधीतील राज्याच्या अर्थसंकल्पावर झालेल्या खर्चाची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यानुसार राज्य शासनाने वर्ष २०२०-२१ साठी रु. ५ लाख कोटी २२ लाख १३ हजार कोटींचा निधी अर्थसंकल्पीत केला होता, त्यापैकी राज्य शासनाने केवळ रु. २ लाख ३५ हजार ५४५ कोटींचा निधी खर्च करण्यात आला. खर्चाचे हे प्रमाण ४६.९०% इतके कमी राहिले आहे.

महाराष्ट्र शासनाला वर्ष २०२०-२१ मध्ये वस्तू व सेवा कर (GST) याचा परतावा केंद्र शासनाकडून रु. ४६ हजार ९५० कोटी येणे गरजेचे होते. मात्र त्यापैकी केवळ रु. ६ हजार १४० कोटी इतका परतावा मिळाला तर रु. ११ हजार ५२० कोटी कर्ज म्हणून प्राप्त झाले आहेत. याचाच अर्थ आजही केंद्र शासनाकडून राज्याला २९ हजार २९० कोटी रुपयांची भरपाई केंद्र शासनाकडून थकीत आहे. अशी माहिती राज्याचे राज्यपाल मान. श्री. भगतसिंह कोश्यारी यांनी अर्थसंकल्प अधिवेशनाच्या दि. १ मार्च, २०२१ रोजी राज्य विधिमंडळाच्या संयुक्त बैठकीत दिली.

### वर्ष २०२०-२१ चा राज्य अर्थसंकल्प व खर्चाची स्थिती :

*तक्ता क्र. १* *रु. कोटीत*

| विभाग | अर्थसंकल्प | खर्च | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| कृषि व पदुम | १२,६६३.६९ | ६,१६६.२२ | ४८.६१ |
| शालेय शिक्षण | ६१,६६५.४६ | ४७,०३६.९९ | ७६.२७ |
| वित्त | १,०८,९८१.७४ | २६,८८१.२१ | २४.६७ |
| अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | १४,८९४.२७ | ८,८६२.७५ | ५९.५० |
| सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | १९,३७५.६१ | ७,८०५.०४ | ४०.०० |
| सार्वजनिक आरोग्य | १३,१०१.७३ | ८,२३०.०१ | ६२.८१ |
| आदिवासी विकास | १२,२५७.३७ | ४,७१४.०७ | ३८.४५ |
| महिला व बाल विकास | ५,४५२.५४ | ३,५८१.२३ | ६५.६८ |
| अल्पसंख्यांक | ६३८.३१ | ७९.१९ | १२.४० |
| इतर विभाग | २,५३,१८२.५१ | १,२२,१८८.४६ | ४८.२६ |
| **एकूण** | **५,०२,२१३.२३** | **२,३५,५४५.१७** | **४६.९०** |

*(स्त्रोत: महाराष्ट्र राज्य, वित्त विभाग, महाकोष वाहिनी, अर्थसंकल्प व्यवस्थापन व सनियंत्रण प्रणाली (BEAM) वर्ष २०२०-२१)*

- ☞ राज्य शासनाने वर्ष २०२०-२१ साठी ५ लाख २ हजार २१३ कोटी २३ लाखांचा निधी अर्थसंकल्पीत केला होता, त्यापैकी फेब्रुवारी, २०२१ पर्यंत केवळ रु. २ लाख ३५ हजार ५४५ कोटी १७ लाखांचा निधी खर्च करण्यात आला. याचाच अर्थ रु. २ लाख ६६ हजार ६६८ कोटी ६ लाखाचा (५३.१०%) निधी खर्च झालेला नाही.
- ☞ वित्त विभागांसह कृषी व पदुम, शालेय शिक्षण, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, सार्वजनिक आरोग्य, आदिवासी विकास, महिला व बाल विकास, अल्पसंख्यांक या विभागांचा खर्चाचा विचार केला तर त्याचे प्रमाण ४८.२६% राहिले आहे.
- ☞ सर्वात कमी खर्च वित्त विभागाने केला असून या विभागाचा अर्थसंकल्प रु. १ लाख ८ हजार ९८१ कोटी ७४ लाखांचा होता, त्यापैकी केवळ रु. २६ हजार ८८१ कोटी २१ लाखांचा (२४.६७%) निधी खर्च झाला आहे.
- ☞ आदिवासी विकास विभागाचा अर्थसंकल्प रु. १२ हजार २५७ कोटी ३७ लाखांचा होता त्यापैकी रु. ४ हजार ७१४ कोटी ०७ लाखांचा (३८.४५%) निधी खर्च झाला आहे.
- ☞ सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा अर्थसंकल्प रु. १९ हजार ३७५ कोटींचा होता, त्यापैकी रु. ७ हजार ८०५ कोटी ४ लाख (४०%) खर्च करण्यात आला.
- ☞ अल्पसंख्यांक विभागाचा अर्थसंकल्प रु. ६३८ कोटी ३१ लाखांचा होता, त्यापैकी केवळ ७९ कोटी १९ लाख (१२.४०%) खर्च करण्यात आले.
- ☞ सार्वजनिक आरोग्य विभागाचा अर्थसंकल्प रु. १३ हजार १०१ कोटी ७३ लाखांचा होता. त्यापैकी रु. ८ हजार २३० कोटी (६२.८१%) खर्च करण्यात आले आहेत.
- ☞ महिला व बाल विकास विभागाचा अर्थसंकल्प रु. ५ हजार ४५२ कोटी ५४ लाखांचा होता, त्यापैकी रु. ३ हजार ५८१ कोटी २३ लाखांचा (६५.६८%) निधी खर्च करण्यात आला.

*(स्रोत: महाराष्ट्र राज्य, वित्त विभाग, महाकोष वाहिनी, अर्थसंकल्प व्यवस्थापन व सनियंत्रण प्रणाली (BEAM) वर्ष २०२०-२१, राज्यपालांचे विधिमंडळातील दि. १ मार्च, २०२१ या पहिल्या अधिवेशनातील भाषण.)*

***

## राज्यात ७ वर्षांत १ लाख ३८ हजार बालकांनी आपले प्राण गमावले

उपसंचालक आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य पुणे -१ यांच्याकडून उपलब्ध झालेल्या माहितीनुसार राज्यात वर्ष २०१४-१५ ते २०२०-२१ या ७ वर्षांच्या कालावधीत राज्यातील ० ते ५ वयोगटातील १ लाख ३८ हजार ५७ इतक्या बालकांचा मृत्यू झाला. अशी धक्कादायक माहिती 'समर्थन'ला प्राप्त झाली असून कोरोना काळात म्हणजे मार्च ते डिसेंबर, २०२० या १० महिन्यांच्या कालावधीत ११ हजार ४५३ बालकांचा मृत्यू झाला आहे.

## वर्ष २०१४-१५ ते २०२०-२१ (७ वर्षे) मध्ये झालेले बालमृत्यू:

*तक्ता क्र. २*

| वर्ष | ० ते ५ वर्ष बालमृत्यू | बालमृत्यूचे प्रमाण (%) |
|---|---|---|
| २०१४-१५ | २६,१०८ | १८.९१ |
| २०१५-१६ | २२०३० | १५.९५ |
| २०१६-१७ | २०२३७ | १४.६६ |
| २०१७-१८ | २०१०५ | १४.५६ |
| २०१८-१९ | २००९६ | १४.५६ |
| २०१९-२० | १८,०२८ | १३.०६ |
| *२०२०-२१ | ११,४५३ | ८.३० |
| **एकूण** | **१,३८,०५७** | **१००** |

*(स्रोत: राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.)*

*टीप: वर्ष- २०२०-२१ची आकडेवारी ही मार्च ते डिसेंबर, २०२० मधील आहे.*

- ☞ वर्ष २०१४-१५ ते २०२०-२१ या कालावधीत महाराष्ट्रात ० ते ५ वयोगटातील १ लाख ३८ हजार ५७ बालकांचा मृत्यू झाला आहे.
- ☞ वर्ष २०१४-१५ मध्ये सर्वात जास्त २६ हजार १०८ बालमृत्यू झाले असून, त्याचे एकूण बालमृत्यूशी प्रमाण १८.९१% इतके आहे.
- ☞ मागील ७ वर्षात बालमृत्यूची सरासरी संख्या १९ हजार ७२२ इतकी मोठी राहिली आहे.
- ☞ वर्ष २०२०-२१ मध्ये मिळालेल्या माहितीनुसार एप्रिल ते डिसेंबर, २०२० या ९ महिन्याच्या कालावधीत राज्यात ११ हजार ४५३ बालमृत्यू झाले आहेत, त्यापैकी ९ हजार ४४८ (८२.४९%) हे अर्भक होते.
- ☞ वर्ष २०२०-२१ मध्ये झालेल्या अर्भक मृत्यूचा विचार केला तर, सर्वात जास्त प्रगत जिल्ह्यात म्हणजे मुंबई - ८२५, अकोला - ६५५, औरंगाबाद - ५७८ व नाशिक - ५५५ इतकी मोठी होती.

एवढ्या मोठ्या प्रमाणावर अर्भक दगावणे ही बाब गंभीर असून प्रगत जिल्ह्यात जिथे वाढते नागरीकरण झाले आहे; झोपडपट्टी आहे तिथे अधिक असल्याचे समोर आले आहे. मृत्यूची जी कारणे दिली जातात त्यामध्ये अकाली प्रसुती, माता व बाळाचे कुपोषण त्यामुळे कमी वजन, संसर्ग, न्यूमोनिया, श्वसन यंत्रणेचा त्रास यामुळे झाले असल्याचे कळते. नागरीकरण होत असलेल्या शहरात हे प्रमाण अधिक असणे ही बाब गंभीर असून ही स्थिती हाताबाहेर जाण्या अगोदर उपाययोजना करणे गरजेचे आहे. तरी संबंधित प्रश्नी शासनाने त्वरित कारवाई करावी, तसे निर्देश जिल्हा स्तरावरील आरोग्य यंत्रणा, महानगरपालिका, नगरपालिका तसेच नगर परिषदांना देण्यात याव्यात. जेणे करून ज्या अर्भकांचे नाहक जीव जात आहेत; ते वाचू शकतील. याबाबत 'समर्थन'ने राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री, राज्याचे आरोग्य संचालक यांच्याशी पत्रव्यवहार केला आहे. याबाबत लवकरात लवकर उपाययोजना करण्यास सुचविले आहे.

***

## ‘रोजगार हमी योजने’वर काम केलेल्या मजुरांचे रु. १३०कोटी ३६ लाखांचे वेतन दोन महिन्यांपासून थकीत

## आदिवासी मजुरांवर उपासमारीची वेळ

रोजगार हमी योजने अंतर्गत अतिशय धक्कादायक बाब निदर्शनास आली असून राज्यातील ‘रोजगार हमी योजने’च्या (रोहयो) मजुरांना जानेवारी व फेब्रुवारी, २०२१ या दोन महिन्याचे वेतन आजही मिळालेले नाही. या देय वेतनाची रक्कम रु. १३० कोटी ३६ लाख इतकी मोठी आहे. रोजगार हमी योजनेवर काम करणारे मजूर हे दारिद्र्यरेषेखालील असून बहुसंख्य मजूर हे आदिवासी आहेत.

शासनाकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, राज्यभरात जी रोजगार हमीची कामे सुरू आहेत. त्यानुसार जानेवारी ते फेब्रुवारी, या दोन महिन्यात ९५ लाख ६५ हजार ६९४ मनुष्य दिवस रोजगार निर्माण झाला असून, ६ लाख ३१ हजार ५७२ कुटुंबांना सरासरी १४ दिवस रोजगार उपलब्ध झाला. मात्र या मजुरांना मजुरीचे रु. १३० कोटी ३६ लाख मिळालेले नाहीत. या कालावधीत ज्या जिल्ह्यांमध्ये रोजगार हमीची कामे निर्माण झाली. त्यामध्ये पालघर, अमरावती, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, चंद्रपूर, नंदूरबार व भंडारा हे आदिवासी जिल्हे आघाडीवर होते. मात्र या जिल्ह्यात रोजगार हमी योजनेवर काम केलेल्या मजुरीचा मोबदलाच न मिळाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

**महात्मा गांधी रोजगार हमी योजना जिल्हानिहाय प्रलंबित मजुरी:**

*तक्ता क्र. ३* *(रु. कोटीत)*

| कालावधी, जानेवारी व फेब्रुवारी, २०२१ | | |
|---|---|---|
| **जिल्हा** | रक्कम | प्रमाण (%) |
| पालघर | १७.९५ | १३.७६ |
| अमरावती | १६.७६ | १२.८६ |
| गडचिरोली | १२.२१ | ९.३७ |
| गोंदिया | ८.८४ | ६.७८ |
| नागपूर | ६.०६ | ४.६५ |
| चंद्रपूर | ५.६४ | ४.३३ |
| नंदुरबार | ५.११ | ३.९२ |
| भंडारा | ४.४८ | ३.४४ |
| इतर जिल्हे | ५३.३१ | ४०.८९ |
| **एकूण** | **१३०.३६** | **१००.००** |

*(स्त्रोत: महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या संकेतस्थळावरून प्राप्त माहिती, दि. २६ फेब्रुवारी, २०२१)*

☞ महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेअंतर्गत ३४ जिल्ह्यात काम चालत असून जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यांच्या कालावधीत सर्व जिल्ह्यांची मिळून रु. १३० कोटी ३६ लाखांची मजुरी प्रलंबित आहे.

☞ पालघर, अमरावती, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, चंद्रपूर, नंदूरबार व भंडारा या ८ आदिवासीबहुल जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर मनुष्य दिवस रोजगार निर्माण झाला.

☞ पालघर जिल्ह्यात जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यांची सर्वात जास्त रु. १७.९५ कोटी मजुरी प्रलंबित आहे.

☞ अमरावती जिल्ह्यात रु. १६ कोटी ७६ लाखांची मजुरी प्रलंबित आहे.

☞ गडचिरोली जिल्ह्यात रु. १२ कोटी २१ लाखांची मजुरी प्रलंबित आहे.

☞ गोंदिया, नागपूर, चंद्रपूर, नंदूरबार व भंडारा या चार जिल्ह्यांची अनुक्रमे रु. ८ कोटी ८४ लाख, रु. ६ कोटी ६ लाख, रु. ५ कोटी ६४ लाख, रु. ५ कोटी ११ लाख व रु. ४ कोटी ४८ लाख इतकी मजुरी प्रलंबित आहे.

याबाबत ‘समर्थन’ने राज्याचे ‘मुख्यमंत्री’ व ‘रोजगार हमी योजना’ मंत्री यांच्याकडे याबाबत दि. २६ फेब्रुवारी, २०२१ रोजी पत्रव्यवहार केला असून त्याबाबत शासनाकडून कोणत्याही प्रकारचे उत्तर अद्याप आलेले नाही.

***

## रेशन धान्य, पोषण आहार आणि शिक्षणापासून स्थलांतरित वंचित.

### 'समर्थन'च्या पाठपुराव्यामुळे ३९९ शाळाबाह्य मुलांना मिळाली शाळा.

**हाताला काम मिळत नसल्यामुळे कोरोना काळात जव्हार, मोखाडा, विक्रमगड, डहाणू मधून सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांपैकी ६८% आदिवासी कुटुंबांचे स्थलांतर.**

पालघर, ठाणे रायगड आणि नाशिक जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागातून रोजगाराच्या शोधात दिवाळीनंतर मोठ्या प्रमाणात मजुरांचे स्थलांतर होत असते. परंतु या स्थलांतरित मजुरांना शासनाच्या धोरणाप्रमाणे निश्चित केलेल्या सेवा-सुविधा उपलब्ध न होणे, कंत्राटदार-ठेकेदारांकडून मजुरांना वेळेवर मजुरी न मिळणे, ती कमी देणे, कामाच्या ठिकाणी मजुरांना मारहाण होणे, स्त्रिया व लहान मुले यांच्यासोबत गैरवर्तन करणे, जोर-जबरदस्तीचे प्रकार घडणे, मूलभूत सोयी-सुविधा, जसे की राहण्याची जागा, पिण्याचे पाणी, आरोग्याच्या समस्या, स्थलांतर करून आलेल्या कुटुंबातील मुलांच्या शाळा सुटणे, ही मुले शाळाबाह्य होणे, असे अनेक प्रश्न ‘**श्रमजीवी संघटने**’च्या निदर्शनास आले होते. या विषयावर श्रमजीवींच्या कार्यकर्त्यांची ‘**समर्थन**’ सोबत बैठक झाल्यानंतर या विषयाच्या मुळाशी जाण्यासाठी ‘समर्थन-श्रमजीवी संघटना’ असे संयुक्तरित्या या स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांचे सर्वेक्षण करणे व त्यात सातत्य ठेवण्याचे ठरले आहे. त्यामध्ये तीन टप्पे ठरविण्यात आले असून, स्थलांतर पूर्व काळात त्यांच्या मूळ गावी जाऊन सर्वेक्षण

करणे, रोजगारासाठी ज्या ठिकाणी ही कुटुंब येतात तेथे सर्वेक्षण करणे तसेच होळी-शिमग्यात आपल्या मूळ गावी जाऊन सण साजरा करून पुन्हा स्थलांतरित होत असतानाचा काळ, या तीन टप्प्यात सर्वेक्षण सुरू असून, या मजुरांचे ट्रॅकींग ठेवले जात आहे. त्यामध्ये त्यांची यादी तयार करणे, त्यांचे मूळ गावातील पत्ते व संपर्क क्रमांक मिळवणे, ते ज्या ठेकेदारासोबत कामासाठी जातात त्यांचा नाव पत्ता देखील संस्थेकडे ठेवला जात आहे. त्यांना येणाऱ्या अडचणी व त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

स्थलांतरित होणारी कुटुंब ही विशेष करून दिवाळी नंतर स्थलांतरित होत असतात. त्या दरम्यान दुर्गम भागातून ही कुटुंब शहराच्या ठिकाणी रोजगारासाठी येतात. शहरात आल्यानंतर मोकळ्या जागेवर झोपड्या बांधून रहाणे, उघड्यावर रहाणे, ज्यांना शक्य असेल ती कुटुंब भाड्याने खोली घेऊन रहातात. परंतु बरीचशी कुटुंब ही उघड्यावरच रहात असतात.

पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड तसेच डहाणू या दुर्गम तालुक्यातून स्थलांतर करून येणारी कुटुंब ही भिवंडी, वसई, अंबाडी व कुडूस येथे येत असतात. तेथे आल्यानंतर जवळच्या विटभट्टीवर, तसेच आजुबाजुच्या शहरांच्या ठिकाणी इमारत बांधकाम व रस्त्याच्या कामावर जातात. तर कोणी नाशिकला शेतीच्या वा बांधकामाच्या कामावर जातात, वसई येथे भाजीपाला, फुल शेती, चारा शेती, फळबाग लागवड या कामांवर जाणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. दगडखाणीवरही काही मजूर जात असतात. पालघर मधील 'सातपाटी' बंदरावर तर वसईतील उत्तन येथे बोटीवर मासेमारी करण्यासाठी मजूर म्हणून जाणाऱ्यांची संख्याही तेवढीच मोठी आहे. तर डहाणू तालुक्यातील काही कुटुंब थेट गुजरात मधील वापी-सिल्वासा या ठिकाणी जात असल्याचेही समजले.

तर गावात जी कुटुंब राहतात, स्थलांतर करीत नाहीत; ती कुटुंब गावाच्या आजूबाजूला शेतमजुरी तर काही जण 'रोजगार हमी योजने'वर काम करीत असल्याचे समजले.

स्थलांतरित मजुरांच्या प्रत्यक्ष स्थितीची पाहणी करण्यासाठी पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड व डहाणू या ४ तालुक्यातील ३२ गावांमध्ये 'श्रमजीवी संघटना' व 'समर्थन' यांनी संयुक्तरित्या सर्वेक्षण आयोजित केले व ते आजही सुरू आहे. या सुरू असलेल्या सर्वेक्षणातून आतापर्यंत पुढे आलेले मुद्द्याच्या आधारे 'समर्थन'ने यावर उपायोजना करण्याचे काम सुरू केले आहे. त्यानुसार त्यांची आरोग्य तपासणी करणे, शाळाबाह्य आढळणाऱ्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे, सहा वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी अंगणवाडीची व्यवस्था करणे, गरोदर व स्तनदा माता यांना पोषण आहार पुरवणे तसेच त्यांना रेशनिंगची तात्पुरती व्यवस्था करणे याबाबत स्थानिक प्रशासनाच्या सदर गोष्टी निदर्शनास आणून देणे, त्यासाठी पत्रव्यवहार करणे, जिल्हा स्तरावर व मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा करणे. प्रसारमाध्यमांमध्ये सातत्याने या विषयी माहिती देणे व स्थलांतरितांच्या प्रश्नांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करण्याचे काम 'समर्थन' व 'श्रमजीवी संघटना' करीत आहे.

## पालघर जिल्ह्यातील जव्हार, विक्रमगड, मोखाडा व डहाणू या तालुक्यातील सर्वेक्षण केलेल्या, ३२ गावांतील स्थलांतरित कुटुंबांची आकडेवारी:

तक्ता क्र.४

| सर्वेक्षण केलेली स्थलांतरित कुटुंब | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तालुका | कुटुंब संख्या | स्थलांतर झालेली कुटुंब | % | पुरुष | स्त्रिया | एकूण | १ ते १४ वयोगटातील स्थलांतरित मुले | | | शाळेत न जाणारी मुले | | | गाव संख्या |
| | | | | | | | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | |
| जव्हार | ३६२ | २९८ | ८२.३२ | २९८ | ३१५ | ६१३ | २०१ | १५१ | ३५२ | ९५ | ६२ | १५७ | ८ |
| विक्रमगड | ३४२ | २५० | ७३.१० | ३९२ | २९० | ६८२ | १६३ | १११ | २७४ | ९२ | ६० | १५२ | ८ |
| मोखाडा | २९६ | १४७ | ४९.६६ | १८९ | १२७ | ३१६ | १५८ | ४५ | २०३ | ५० | २० | ७० | ८ |
| डहाणू | २९८ | १९४ | ६५.१० | २०२ | १४५ | ३४७ | १५२ | ६५ | २१७ | ४० | ३२ | ७२ | ८ |
| एकूण | १,२९८ | ८८९ | ६८.४९ | १,०८१ | ८७७ | १,९५८ | ६७४ | ३७२ | १,०४६ | २७७ | १७४ | ४५१ | ३२ |

*(स्रोत: समर्थन व श्रमजीवी संघटना, महाराष्ट्र यांनी डिसेंबर, २०२० मध्य स्थलांतर करणाऱ्या कुटुंबांचे केलेले सर्वेक्षण)*

- पालघर जिल्ह्यातील जव्हार, विक्रमगड, मोखाडा व डहाणू या ४ तालुक्यांमधील ३२ ग्रामपंचायतींमधील १ हजार २९८ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यापैकी ८८९ (६८.४९%) कुटुंब ही स्थलांतरित झाली होती.
- स्थलांतरित झालेल्या ८८९ कुटुंबांमध्ये सर्वात जास्त जव्हार-२९८ (३३.५२%), विक्रमगड-२५० (२८.१२%), डहाणू-१९४ (२१.८२%) व मोखाडा-१४७ (१६.५४%) कुटुंबांचा समावेश होता.
- स्थलांतरित झालेल्या ८८९ कुटुंबांमध्ये १ हजार ९५८ जणांचा समावेश असून त्यापैकी १ हजार ८१ (५५.२१%) पुरुष तर ८७७ (४४.७९%) महिलांचा समावेश होता.
- स्थलांतरित झालेल्या ८८९ कुटुंबांमध्ये वय वर्षे १ ते १४ वयोगटातील १ हजार ४६ मुलांचा समावेश असून त्यापैकी ६७४ मुले (६४.४४%) तर ३७२ मुली (३५.५६%) होत्या.
- स्थलांतरित झालेल्या १ हजार ४६ मुलांपैकी ४५१ (४३.१२%) मुले शाळेत जात नव्हती.
- शाळेत न जाणाऱ्या ४५१ मुलांपैकी २७७ मुले (६१.४२%) असून १७४ मुलींचा (३८.५८%) समावेश होता.
- शाळेत न जाणाऱ्या ४५१ मुलांपैकी जव्हार-१५७ (३४.८१%), विक्रमगड- १५२ (३३.७०%), डहाणू-७२ (१५.९६%) तर मोखाड्यातील ७० (१५.५३%) मुलांचा समावेश होता.

***

## महाराष्ट्रात 'निर्भया निधी'चा वापर नाही, 'समर्थन'च्या अभ्यासातून धक्कादायक माहिती उघड

महिला अत्याचाराचे एखादे प्रकरण घडले की त्यावर विधिमंडळासह समाज माध्यमावर जोरदार चर्चा होते. विधानसभा किंवा संसदेत यामध्ये काही कायदे केले जातात किंवा कायद्यांमध्ये दुरुस्ती केली जाते. पण जे कायदे केले जातात किंवा जो निधी दिला जातो त्याचा वापर होतो का? महिला सक्षमीकरणासाठी बोलणारे सरकार प्रत्यक्षात मात्र काय करते असा सवाल उपस्थित होतो. हा सवाल उपस्थित झाला आहे, माहितीच्या अधिकाराखाली मिळालेल्या एका धक्कादायक माहितीवरून. महिला सक्षमीकरणासाठी दिलेला निधी महाराष्ट्रात वापरातच आणला जात नाही अशी धक्कादायक माहिती 'समर्थन' अर्थसंकल्प अध्ययन केंद्राच्या अभ्यासातून समोर आली आहे.

महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचारात सातत्याने वाढ होत आहेत. असे असताना दिल्लीमध्ये २०१२ साली घडलेल्या 'निर्भया' प्रकरणानंतर केंद्र सरकारने 'निर्भया निधी' स्थापन केला. सर्व राज्यांना महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी 'निर्भया निधी' देण्यास सुरुवात केली होती. महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी प्रत्येक राज्याने उपाययोजना कराव्या हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. या निधी अंतर्गत सीसीटीव्ही बसवणे, स्टॉक सेंटर स्कीम राबवणे, महिला सुरक्षेसाठी मोबाईल ॲप्स बनवणे, महिला पोलिसांच्या नियुक्त्या करणे, पीडितांचे पुनर्वसन करणे अशी कामे करण्यासाठी या निधीची तरतूद करण्यात आली होती. यासाठी राज्यांना तब्बल १ हजार २८४ कोटी ६६ लाख रुपये वाटप करण्यात आले. ज्या महिला काम करतात त्यांना संरक्षण म्हणून राज्य सरकारने काही कायदे करावेत अशा सूचना राज्यांना देण्यात आल्या. निर्भया प्रकरणाची एवढी चर्चा होऊनही देशातील राज्यांनी हा निधी खर्च केला नाही. त्यात महाराष्ट्राचा क्रमांक वरचा राहिला आहे.

## केंद्र शासनाकडून महिलांच्या सुरक्षेसाठी येणारा ८९ टक्के 'निर्भया निधी' महाराष्ट्रात अखर्चित

### २०२ कोटींपैकी १८१ कोटी रुपये खर्चच केले नाही

### महिला आमदार व महिला संघटनांनी ''निर्भया'' निधीच्या योग्य विनियोगासाठी दबाव आणावा

### महिला कल्याणाचे केवळ कायदे नको त्या कायद्यांची अंमलबजावणी करा

महाराष्ट्रात भाजप आणि शिवसेनेच्या युती सरकारने या निधीचा वापर केला नसल्याचे उघड झाले आहे. ८९% निधी हा अखर्चित राहिला आहे. तीच स्थिती सध्याच्या महाविकास आघाडी सरकार मध्ये देखील कायम आहे. महाराष्ट्र 'निर्भया निधी' खर्च करण्यात सर्वात पिछाडीवर राहिला आहे. 'समर्थन'ला माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त झालेल्या माहितीनुसार वर्ष २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाच्या कालावधीत केंद्र शासनाकडून महाराष्ट्राला रु. २०२ कोटी ३२ लाखांचा निधी प्राप्त झाला.

त्यापैकी केवळ रु. २० कोटी ७५ लाखांचा (१०.२५%) निधी खर्च करण्यात आला. तर रु. १८१ कोटी ५७ लाखांचा (८९.७५%) निधी अखर्चित राहिला आहे. हे या योजनेचे व महाराष्ट्रातील महिलांचे दुर्दैव आहे.

महिलांवरील अत्याचार सातत्याने वाढत आहेत. वर्ष २०१८ मध्ये ३५ हजार ५०१, २०१९ मध्ये ३७ हजार ११२ तर २०२० मध्ये (जानेवारी ते नोव्हेंबर पर्यंत) २६ हजार ५८६ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. हा काळ कोरोनाचा असल्यामुळे कदाचित दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण कमी आहे. मात्र महिलांना न्याय मिळण्याचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे.

तर महिला आयोगाकडे २१ मार्च २०२० ते ३० नोव्हेंबर २०२० पर्यंत सुमारे १ हजार १६१ तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यापैकी १ हजार ७९ केसेसची आयोगाने दखल घेतली असे समजते, मात्र किती महिलांना न्याय मिळाला हा प्रश्न अनुत्तरीत आहे. महत्त्वाचे म्हणजे महिला आयोगाचा अध्यक्ष अजून नेमला गेलेला नाही. या संदर्भात विधान परिषदेच्या उप सभापती आणि शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांनी निर्भया फंडाचा वापर करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना विनंती केल्याचे सांगितले. महिलांवर अत्याचार सातत्याने घडत आहेत आणि दोषसिद्दीचे प्रमाण महाराष्ट्रात ६० टक्क्यांपर्यंत आहे. पूर्ण भारतात 'निर्भया निधी' वापरण्याचे प्रमाण खूप कमी असल्याचे त्यांनी कबूल केले. त्यापुढे त्या असेही म्हणाल्या की, खरे तर हा निधी २ हजार कोटींपर्यंत वाढवण्यात आला होता, परंतु तो खर्च होत नसल्याने कमी करण्यात आला आहे. ज्या राज्यांनी हा निधी कमी खर्च केला त्यामध्ये महाराष्ट्र, गुजरात व दिल्ली ही महिला अत्याचारात आघाडीची राज्य आहे. परंतु ज्या केरळ राज्यात साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे, महिलांमधील जाणीव-जागृतीचे प्रमाण अधिक आहे, तिथेही हा निधी योग्य प्रमाणात वापरला नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

मान. श्री. उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना 'निर्भया निधी' वापरण्याबाबत आपण पहिले निवेदन दिले होते. त्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बैठक घेऊन तो निधी वापरण्याबाबत आदेशही दिल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे महाराष्ट्रात नुकताच साजरा झालेला 'जागतिक महिला दिन' म्हणजे ८ मार्च पुरताच उरला आहे का? हा प्रश्न निर्माण होतो. राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर महिला अत्याचाराचे गुन्हे घडत असताना, सरकारने उदासिनता झटकून महिलांच्या सुरक्षेसाठी असलेल्या योजनांची योग्य व तात्काळ अंमलबजावणी केली, तरच महिला सक्षमीकरण होऊ शकणार आहे. त्यासाठी महिला आमदार व महिला संघटनांनी ''निर्भया निधी''च्या योग्य विनियोगासाठी दबाव आणणे गरजेचे आहे, महिला कल्याणाचे केवळ कायदे नको त्या कायद्यांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यामुळे 'निर्भया' सारख्या महत्त्वाचा निधी वाया जाणार नाही; तो योग्य त्या कारणासाठी खर्च होईल याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. तरच महिला सक्षमीकरण खऱ्या अर्थाने सत्यात उतरेल.

(स्त्रोत: गृह विभाग, मंत्रालत्य, मुंबई यांच्यामकडून दि. ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती)

***